CMYK

## यंदाही वारकऱ्यांना टोलमाफ

सोलापूर : पंढरीची वारी सुरु झाली आहे. पुण्यातून पालखी पुढे सासवडच्या दिशेने निघाली असून येत्या काही दिवसांत चोहोबाजुंनी पंढरपूरकडे वाहनांचे जथ्थेच्या जथ्थे येणार आहेत. या वारकऱ्यांना राज्य सरकारने दरवर्षीप्रमाणे टोलमाफी जाहीर केली आहे. परंतू, ही टोलमाफी असेच टोलनाक्यावर गेल्यावर मिळणार नाही तर त्यासाठी वाहन मालकांना वाहनाची कागदपत्रे घेऊन जवळचे आरटीओ कार्यालय गाठावे लागणार आहे. वारकऱ्यांना आजपासून टोलमाफी मिळणार असून २१ जुलैपर्यंत याची मुदत ठेवण्यात आली आहे. वारकऱ्यांना टोलनाक्यावर आरटीओने दिलेला पास, स्टीकर दाखवावा लागणार आहे. यानंतरच वाहन सोडले जाणार आहे. या पास, स्टीकरशिवाय वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार नाही. २०२२ मध्ये राज्य सरकारने पहिली टोलमाफी जाहीर केली होती.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## हार्दिक अष्टपैलू खेळाडूमध्ये अव्वलस्थानी




नवी दिल्ली : अष्टपैलू हार्दिक पांड्याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आयसीसीच्या टी२० क्रमवारीत अष्टपैलूंच्या यादीत अव्वल स्थानावर विराजमान होणारा हार्दिक पांड्या पहिला खेळाडू ठरलाय. २०२४ टी२० विश्वचषकात हार्दिक पांड्याने अष्टपैलू खेळी करत विजयात सिंहाचा वाटा उचलला. फायनलमध्ये हार्दिक पांड्याने भेदक गोलंदाजी करत विजय खेचून आणला. फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये भारतीय खेळाडूंनी दबदबा निर्माण केला होता. आता अष्टपैलूंच्या यादीत हार्दिक पांड्याने नवा किर्तिमान रचला आहे. या आधी कोहली, सूर्यकुमार यांनी अव्वल स्थानावर कब्जा मिळवलाय.

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ४ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २७५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# ‘मातोश्री’चा जुगार, कुणाचा ‘घात’ होणार?

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्य विधान परिषदेची निवडणूक जिंकण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात मतांच्या गणिताची जुळवाजुळव करण्यासाठी रस्सीखेच सुरू झाली असून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी ऐनवेळी मिलिंद नार्वेकर यांना रिंगतणात उतरवल्याने घोडेबाजाराला ऊत येण्याची चिन्हे दिसत आहेत. नार्वेकरांना मैदानात उतरवून ठाकरे यांनी मोठा जुगार खेळला असून त्याने महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या उमेदवाराचा पुन्हा घात होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. एकूणच या निवडणुकीवरून राजकीय वातावरण तापत चालले आहे.**

महाविकास आघाडीला आपला तिसरा उमेदवार निवडून आणण्यासाठी चार किंवा जास्त मतांची गरज पडू शकते. तर महायुतीला आपला नववा उमेदवार निवडून आणण्यासाठी सहा मतांची गरज भासणार आहे. त्यामुळे जुळवाजुळव कशी करणार? कुणाचे आमदार फुटणार? याची चर्चा रंगली आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी २३ मतांचा कोटा असेल. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलैला होणाऱ्या निवडणुकीसाठी १२ उमेदवार रिंगणात असणार आहेत. महाविकास आघाडीकडून तीन उमेदवार दिल्याने आता ही निवडणूक होणे अटळ आहे. विधानपरिषदेच्या या ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात उतरल्याने महाविकास आघाडी असू देत किंवा मग महायुती. दोन्हीकडून मतांची जुळवा जुळवा करून आपल्या उमेदवारांना निवडून आणण्याचे एक मोठा आव्हान वरिष्ठ नेत्यांसमोर असणार आहे. मतांची जुळवाजवळ नेमकी कशी केली जाणार? कोणाला किती मतं मिळणार? अपक्ष आमदारांचा नेमका रोल किती आहे?




**● राजकीय जुगार...:** सध्याच्या पक्षीय बलाबलानुसार विधानपरिषदेच्या ८ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होऊ शकतात, तर एका जागेवरुन काँग्रेसच्या प्रज्ञा सातव आणि शेकापच्या जयंत पाटील यांना निवडून आणण्याइतपत संख्याबळ महाविकास आघाडीकडे आहे. याच जागेवरुन उद्धव ठाकरे यांनी मिलिंद नार्वेकर यांना मैदानात उतरवून राजकीय जुगार खेळला आहे.

**● पुनरावृत्ती होणार काय? :** नार्वेकर यांच्यामुळे काँग्रेसच्या उमेदवार प्रज्ञा सातव यांचा पराभव होऊ शकतो, असा खळबळजनक दावा सरनाईक यांनी केला आहे. जून २०२२ मध्ये शिवसेनेत बंड होण्याच्या आदल्या रात्री झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत हमखास निवडून येण्याची खात्री असलेल्या काँग्रेसच्या चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव झाला होता. त्याचीच पुनरावृत्ती या निवडणुकीत होणार का, अशी चर्चा आता सुरु झाली आहे.

असे प्रश्न उपस्थित होत आहेत. विधानपरिषदेची १२ जुलैला होणारी निवडणूक बिनविरोध होईल अशी स्थिती होती. मात्र, शेवटच्या दोन दिवसांमध्ये महाविकास आघाडीने तिसरा उमेदवार दिला आणि या निवडणुकीची चुरस आता आणखी वाढली आहे. महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या प्रज्ञा सातव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शेकापचे जयंत पाटील आणि वाईल्ड कार्ड एन्ट्री झाली ते शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर यांची. त्यामुळे आता महाविकास आघाडीला आपला तिसरा उमेदवार निवडून आणण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

**● काँग्रेसलाच अधिक धोका? :** मिलिंद नार्वेकर हे उत्कृष्ट गोलंदाज आहेत. मलाही त्यांना विधान परिषदेच्या सभागृहात बघायला आवडेल. खरेतर २५ वर्षांपूर्वीच ते या सभागृहात असायला हवे होते. मात्र, त्यांच्यावर अन्याय झ ाला. आताच्या निवडणुकीत त्यांच्या येण्याने शेकापचे जयंत पाटील व काँग्रेसच्याच उमेदवाराला धोका वाढला आहे, असे भाकित मुख्यमंत्री एकनाथा शिंदे गटाचे नेते प्रताप सरनाईक यांनी बुधवारी वर्तवले आहे.

**● फ्लोअर मॅनेजमेंट :** नार्वेकर यांचे सर्वपक्षीयांशी असलेले सलोख्याचे संबंध पाहता ते निवडणुकीत चमत्कार करु शकतात, अशी चर्चा आहे. फ्लोअर मॅनेजमेंट करण्यासाठी नार्वेकरांनी नेत्यांच्या भेटीगाठी सुरु केल्या आहेत.

### विधानसभेत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये कोणाची किती ताकद असेल याविषयी अंदाज बांधले जात आहेत.

**● महाविकास आघाडी**
- राष्ट्रवादी शरद पवार : १२
- उद्धव ठाकरे शिवसेना : १६
- काँग्रेस : ३७
- = एकूण - ६५

**● छोटे घटक पक्ष**
१) बहुजन विकास आघाडी : ३
२) समाजवादी पक्ष : २
३) एमआयएम : २
४) माकप : १
५) शेतकरी कामगार पक्ष : १
= एकूण - ९

**● महाविकास आघाडीला पाठिंबा देऊ शकणारे पक्ष**
१) समाजवादी २,
२) एमआयएम २,
३) माकप १,
४) शेतकरी कामगार पक्ष १

**मतांची जुळवाजुळव करण्यासाठी चार किंवा त्यापेक्षा अधिक मतांची गरज पडेल.**

**● महायुती**
- राष्ट्रवादी (अजित पवार) ४१
- भाजपा - १०३
- शिवसेना - ३८
- = एकूण - १८२

**● राष्ट्रवादी (अजित पवार) पाठिंबा देणारे आमदार**
१) देवेंद्र भुयार
२) संजयमामा शिंदे,
३)राष्ट्रवादी + अपक्ष - ४

**● एकनाथ शिंदे शिवसेना पाठिंबा देणारे आमदार**
नरेंद्र भोंडेकर, किशोर जोरगेवार, लता सोनवणे, बच्चू कडू, राजकुमार पटेल, गीता जैन, आशीष जैसवाल, मंजुळा गावीत, चंद्रकांत निंबा पाटील, राजू पाटील

**● भाजपला पाठिंबा देणारे आमदार**
रवी राणा, महेश बालदी विनोद अग्रवाल, प्रकाश आवाडे, राजेंद्र राऊत, विनय कोरे, रत्नाकर गुट्टे

**महायुतीला आपले नऊ उमेदवार निवडून आणण्यासाठी आणखी सहा मतांची गरज पडणार आहे. त्यामुळे अपक्ष आमदारांवर महायुती या सगळ्यासाठी अवलंबून असेल.**

# अर्जासाठी कागदपत्रं मिळेनात, पोर्टल ओपन होईना; लाडकी बहीण योजनेच्या रणरागिणींचा जीव टांगणीला

**● चार दिवसांपासून ‘नारीशक्ती’ संकेतस्थळ बंदच**

**महसूल प्रशासनदेखील गोंधळलेल्या अवस्थेतच**

सुराज्य/खास प्रतिनिधी

२१ ते ६५ वर्षापर्यंतच्या युवती तसेच महिलांना दर महिन्याला १५०० रुपये देण्याची योजना घोषित झाल्यानंतर या योजनेचा लाभ घेण्याच्या पार्श्वभूमीवर, अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महिला मंडळ पुढं सरसावलं. पण अर्जासोबत जोडण्यासाठी आवश्यक कागदपत्रं मिळण्यात येत असलेल्या अडचणी दुसरीकडं मुख्यत्वे, ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजनेसाठी ‘नारी शक्ती’ हे चार दिवसांपासून ओपन होत नसलेलं पोर्टल यामुळं प्रत्यक्ष लाभार्थी महिलांना ऑनालाईन अर्ज सादर करणं अडचणीचे झाले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी धडपडणाऱ्या महिलांची त्यातून कुंचबंना होत आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष अर्ज घेतले जात असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात






आला. तसेच योजनेसाठी शेतीची अट वगळण्यात आली आहे. लाभार्थी महिलांचे वय २१ ते ६५ वर्ष करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आता ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहे. या योजनेसाठी सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. परंतु , योजना जाहीर होऊन चार दिवस झाले तरी पोर्टल अद्याप सुरु झाले नाही. योजनेची घोषणा झाली आहे. मात्र पोर्टल अद्याप बंदच आहे. त्यामुळे योजनेसाठी शासनाकडून पूर्वतयारी झाली नसल्याचे स्पष्ट होत आहे. ही योजना १ जुलैपासून लागू होणार आहे. त्याळे १ जुलैपासून पोर्टल सुरू होण अपेक्षित असताना पोर्टल अद्याप बंदच आहे. त्यामुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सेतू कार्यालयात सध्या ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ऑफलाईन प्रक्रियेनंतर ऑनलाईन प्रक्रिया पुन्हा करावी लागणार आहे.

**● पैसे घेता येत नसल्याने अनेकांचा कानाडोळा**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या अर्जासोबत जोडावी लागणारी कागदपत्रे देण्यासाठी महा-ई-सेवा केंद्र, सेतू कार्यालय, तहसीलदार कार्यालय, तलाठी कार्यालय या ठिकाणी परवापर्यंत अव्वाच्या सव्वा पैसे घेऊन कागदपत्रे दिली जात होती. कागदपत्रे मिळवून देण्याच्या दलालांच्या टोळ्या संबंधित कार्यालयांमध्ये वेगानं वावरत होत्या. तथापि, याप्रकरणात पैसे घेण्याच्या प्रकारांवर कारवाईतून निर्बंध आण्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सज्जड दम दिल्यामुळं कालपासून कागदपत्रे काढून देणाऱ्या दलालांची धडपड कमी झाल्याचे संबधित ठिकाणी दिसून येत आहे. पैसे मिळत नसल्यामुळे त्यांच्याकडून कागदपत्रे काढून देण्याकडे कानाडोळा केला जात असल्याचे बुधवारी (ता.३) बहुतांश ठिकाणी दिसून आले.

**● तलाठी, अंगणवाडी सेविका यांच्याकडे अर्ज करता येईल जमा**

मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी योजनेसाठी एकनाथ शिंदे यांनी रहिवास प्रमाणपत्र तसेच उत्पनाचा दाखला ही कागदपत्रे कमी केल्याने आता अर्ज सादर करणे सोपे झाले आहे. यापुढे तलाठी, अंगणवाडी सेविका हे अर्ज स्विकारण्याचे काम करणार आहे, त्यांच्याकडे अर्ज सादर करावा असे उत्तर सोलापूर तालुक्याचे नायब तहसीलदार विजय कवडे यांनी सांगितले आहे. या योजनेसाठी लागणारे कागद महिलांना होणारा त्रास कमी करण्यासाठी दोन खिडकी योजना राबविण्यात येणार होती.पण कागदपत्रे कमी झाल्याने दोन खिडकीचे केलेले नियोजन रद्द करण्यात आले, असेही ते म्हणाले.

# बेहिशोबी मालमत्तेप्रकरणी कृषी सहायकावर गुन्हा दाखल

**● लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई**

सोलापूर : १९ वर्षात १४ लाख ९३ हजार ८१७ रुपयांची बेहिशोबी मालमत्ता मिळविल्याप्रकरणी कृषी सहायक व त्याच्या पतीविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कृषी सहायक काशिनाथ यल्लप्पा भजनावळे (वय ५०) आणि किशोरी काशिनाथ भजनावळे (वय ४५, दोघे रा. सिध्दापूर, ता.मंगळवेढा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. काशिनाथ भजनावळे हे सध्या करमाळा येथे कृषी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी फिर्याद दाखल केली आहे. कृषी सहायक काशिनाथ भजनावळे यांनी भ्रष्ट मार्गाने मालमत्ता कम विली असल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी आलेल्या होत्याा. त्याावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भजनावळे यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आली होती. किशोरी भजनावळे यांनी काशिनाथ भजनावळे यांना भ्रष्ट मार्गाने अपसंपदा संपादित करण्यास सहाय्य केल्याचे चौकशी मध्ये निष्पन्न झाल्याने याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ‘हाऊस’मध्ये घुमला आवाज



सोलापूर : सोलापूर शहरातील दोन आणि मोहोळमधील एक अशा तीन आमदारांनी बुधवारी विधानसभेत सोलापूरच्या विविध विषयांवर आवाज उठवला. आ.विजय देशमुख यांनी शहरातील खाजगी पाणीपट्टीचा, आ.सुभाष देशमुख यांनी मंद्रूपमधील एमआयडीसीचा तर आ.यशवंत माने यांनी माळढोक अभयारण्याच्या विषयाकडे लक्ष वेधले.

## माळढोक येथील अभयारण्यास संरक्षक तारेचे कुंपण घाला

**● आमदार यशवंत माने यांची मागणी**

उत्तर सोलापूर : नान्नज-मार्डी येथील अभयारण्याला तारेचे कुंपण घालण्यासाठी तसेच मोहोळ, पंढरपूर मधील विविध मागण्यांसाठी मोहोळचे आमदार यशवंत माने यांनी विधानसभेत आवाज उठवला. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आमदार यशवंत माने यांना या कामासाठी निधी दिला जाईल असे आश्वासन दिले.



मोहोळ तालुक्यातील बैरागवाडी व पंढरपूर तालुक्यातील बार्डी या वन विभागातील वनगाईमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज, मार्डी माळढोक अभयारण्यातील वन्यजीवांमुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, माळढोक अभयारण्याला, बैरागवाडी येथील बार्डी वनक्षेत्रास संरक्षक तारेचे कुंपण घालावे, त्यासाठी त्वरित निधी उपलब्ध करून द्यावा. वन्यजीवामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाचे पंचनामा झाले मात्र अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नाही अशा नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी माने यांनी केली. आमदार माने यांनी केलेल्या मागण्यांवर त्वरित कार्यवाही करावी अशा सूचना वनमंत्री मुनगुंटीवार यांनी सोलापूर जिल्ह्याचे उपवनसंरक्षक अधिकारी धैर्यशील पाटील यांना दिल्या.

## मंद्रूप एमआयडीसीसाठी आ.सुभाष देशमुख प्रयत्नशील

**● उद्योगमंत्र्यांसोबत बैठकीचे आयोजन**

सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील एमआयडीसीसाठी आमदार देशमुख यांनी पुन्हा प्रयत्न सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आमदार सुभाष देशमुख यांच्या पुढाकाराने मुंबईत उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत औद्योगिक वसाहतींच्या विकासाबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.



या बैठकीत एमआयडीसीचे इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्याबरोबरच नवे उद्योग स्थापन करण्यासाठी लागणारे अनुकूल वातावरण निर्मिती आणि रोजगार संधींमध्ये वाढ करण्याच्या उपाययोजनांवर चर्चा झाल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले. मंद्रुप येथे एमआयडीसी करण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. आजच्या बैठकीमुळे मंद्रूप येथील औद्योगिक वसाहतीस नवीन दिशा मिळून, आर्थिक विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे, असे आमदार सुभाष देशमुख म्हणाले.

## सोलापूर शहरातील सरसकट खासगी पाणीपट्टी रद्द करा

**● आ.विजय देशमुख यांची अधिवेशनात मागणी**

सोलापूर : महापालिका प्रशासनाकडून शहरात लावण्यात आलेली सरसकट खासगी पाणीपट्टी रद्द करावी अशी मागणी करत बेकायदा पाणीपट्टी वसुलीकडे विधानसभा अधिवेशनात भाजपचे आ. विजयकुमार देशमुख यांनी लक्ष वेधले.

मुंबई येथील विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे आमदार विजय देशमुख यांनी खासगी नळपाणीपट्टीकडे लक्ष वेधले. सोलापूर महापालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील रहिवाशांना मिळकत करासोबत सरसकट खासगी पाणी बिल वाटप करण्यात येत आहे. हा सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होत आहे. हा महत्वाचा मुद्दा उपस्थित करत





नगरविकास विभागाचे महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या बेकायदा पाणीपट्टी वसुलीकडे लक्ष वेधून घेत ही बेकायदा वसुली थांबण्यात यावी, अशी मागणी केली. महापालिकेने शहरात खासगी नळ नाही त्या ठिकाणी सरसकट पाणीपट्टी आकारली आहे. तशी बिले देण्यात येत आहेत. यासंदर्भात संबंधित मिळकतदारांकडून नाराजीचा सूर होता. या विषयासंदर्भात आमदार देशमुख यांनी विधानसभेत आवाज उठवला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




१२१ जण म्हणजे काय ! मलाच लाज वाटते आहे !

| कल्याण | मुंबई |
|---|---|
| 138-24-167 | 356-47-179 |

CMYK